आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या अधिपत्याखालील प्रस्तावित २६६१ अस्थायी पदांना व ७६० अतिरिक्त पदांना सन २०१७-१८ या वर्षी दि.०१/१०/२०१७ ते ३१/१२/२०१७ पर्यत चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग
शासन निर्णय क्र. दुविआ-१४१७/प्र.क्र.५७/पदुम-९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक- २६ ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा :-</u> १) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.दुविआ १४१६/प्र.क्र.४९/पदुम ९, दि.१५/०३/२०१७.
२) आयुक्त,दु. वि. वि. यांचे पत्र क्र.आदुवि -१५ (९)/अस्थायी पदे /२०१७-१८/४७०१, दि.१३/१०/२०१७.
३) वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क./ दि.०३/१०/२०१७

प्रस्तावना:

आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचा-यांच्या एकूण ४०९७ पदांच्या सुधारित आकृतीबंधास शासनाने दि.३०/०८/२०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सुधारित आकृतीबंध मंजूर झाल्यानंतर आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांच्या अखत्यारीतील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाची एकूण **२७०० अस्थायी पदे व ९७४ अधिसंख्य पदे** दि.०१/०३/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ पर्यत चालू ठेवण्यास वरिल संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. आता पुढील कालावधीसाठी **२६६१ अस्थायी पदांना व ७६० अतिरिक्त पदांना** मुदतवाढ देण्याबाबत आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांनी सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :-

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांच्या अखत्यारितील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या प्रस्तावित एकूण **२६६१** अस्थायी पदे व **७६०** अतिरिक्त पदांना **दि.०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७** पर्यत चालू ठेवण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. अस्थायी व अतिरिक्त पदांचा गोषवारा विवरणपत्र **“अ”** मध्ये स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेला आहे.

१. प्रस्तावित पदांपैकी सहा महिन्यापेक्षा अधिक काळ रिक्त असलेली पदे वगळण्यात येतील.

२. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांनी सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर ४०९७ पदांसह सर्व एकूण पदांचा आढावा घेऊन नेमकी किती पदे आवश्यक आहेत, याबाबतची माहिती शासनास सादर करुन दि.३१/१२/२०१७ पूर्वी सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरिय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक राहिल.

३. या प्रयोजनार्थ होणारा खर्च सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदर आदेश वित्त विभाग शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आपूक,दि.३/१०/२०१७ अन्वये प्रशासनीक विभागास प्रदान करण्यात आलेल्याअधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०२६१६५८१८५५०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सोबत :- विवरणपत्र “अ”

Ashok Tanbaji Uike

Digitally signed by Ashok Tanbaji Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=87cfab3c12a61b33987277f837a341fb6c84ebe6d1bf10339d150649af95e5b8, cn=Ashok Tanbaji Uike
Date: 2017.10.26 17:07:22 +05'30'

(अशोक उईके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी , मुंबई-१८ (१० प्रती).
२) जनसंपर्क अधिकारी, आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय, वरळी , मुंबई (३ प्रती).
३) उपायुक्त (प्रशासन), आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय, वरळी , मुंबई (३ प्रती).
४) उप आयुक्त(वित्तीय सल्लागार), आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय, वरळी, मुंबई (३ प्रती).
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा अनुज्ञेयता लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
६) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी, मुंबई-१८.
८) प्रकल्प अधिकारी, दुग्ध प्रकल्प, दापचरी.
९) सर्व शासकीय दूध योजना, नागपूर, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर, नांदेड, औरंगाबाद, अमरावती, अकोला, भूम, अहमदनगर, वणी, परभणी, नांदुरा, धुळे, यवतमाळ, उदगीर, पुणे, मिरज.
१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/उपकोषागार अधिकारी, तलासरी, दापचरी/चाळीसगांव/ खोपोली/महाड/चिपळूण/कणकवली/उदगीर,भूम/दिंडोरी/गंगाखेड/हिंगोली,जि.परभणी/नांदुरा. जि.बुलढाणा/कन्नड,वैजापूर,सिल्लोडजि.औरंगाबाद/तळोदा/साक्री/नंदूरबार/तुमसर,साक्रोली जि. भंडारा/वर्धा.
११) प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती.
१२) सर्व जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,/ आयुक्त पशुसंवर्धन पुणे/निबंधक , सहकारी संस्था, पुणे.
१३) व्यवस्थापक, पशुपैदास व संगोपन केंद्र पालघर, जिल्हा-पालघर/
१४) अतिरिक्त आदिवासी आयुक्त नाशिक.
१५) जिल्हाधिकारी व उप आदिवासी आयुक्त ठाणे ,
१६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे/
१७) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक विकास प्रकल्प शहापूर/जव्हार, जि.ठाणे.
१८) वित्त विभाग व्यय-२/ वित्त विभाग (वित्तीय सुधारणा) /
१९) कार्यासन क्रमांक पदुम-१६ /
२०) निवड नस्ती.

शासन निर्णय क्र. दुविआ-१४१७/प्र.क्र.५७/पदुम-९, दि.२६/१०/२०१७ सोबतचे विवरणपत्र "अ"

अ. क्र.	कार्यालय/योजनेचे नांव	दि.३०.०९.२०१७ पर्यत पदांना मंजूरी प्राप्त		दि.०१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यत मंजूरी आवश्यक पदे	
		अस्थायी	अतिरिक्त	अस्थायी	अतिरिक्त
१	३	४	५	६	७
१	शासकीय दूध योजना, अहमदनगर व शित. केंद्र, ब्राम्हणपाडा, तिसगांव, अकोले, राजूर, जामखेड, नारायणगव्हाण.	६०	०१	६०	०१
२	शासकीय दूध योजना, वणी व शासकीय शितकरण केंद्र,	१०	-	१०	-
३	शासकीय दूध योजना, परभणी व शासकीय शित. केंद्र, गंगाखेड, हिंगोली.	६२	-	६२	१४
४	शासकीय दूध योजना, नांदुरा व शित. केंद्र, मातोळी, चिखली, खामगांव.	१३	०२	१३	०२
५	शासकीय दूध योजना, औरंगाबाद व शित. केंद्र, कन्नड, जालना, वैजापूर, सिल्लोड.	५७	-	५७	२०
६	शासकीय दूध योजना, धुळे व शासकीय शित. केंद्र, तळोदा, नंदूरबार व साक्री.	३३	०३	३६	०४
७	शासकीय दूध योजना, भूम व शासकीय शितकरण केंद्र, परांडा.	४२	११	४२	०९
८	शासकीय दूध योजना, अकोला व शासकीय शितकरण केंद्र, वासिम.	५३	०८	५३	०८
९	शासकीय दूध योजना, गोंदिया व शित. केंद्र, भंडारा, तुमसर, कोहमारा, सातगांव.	८२	-	८२	४
१०	शासकीय दूध योजना, चंद्रपूर व शितकरण केंद्र, नागभिंड, कन्हेरी.	७७	२६	७७	०७
११	शासकीय दूध योजना, वर्धा व शासकीय शितकरण केंद्र, मनसर,	५१	-	५१	४
१२	शासकीय दूध योजना, नागपूर.	-	१३	-	०७
१३	शासकीय दूध योजना, अमरावती व शितकरण केंद्र, परतवाडा, मोर्शी.	०९	१०	०९	०८
१४	शासकीय दूध योजना, नांदेड व शितकरण केंद्र, नरशी.	५८	२४	५८	२७
१५	शासकीय दूध योजना, यवतमाळ व शितकरण केंद्र, पुसद, मारेगांव.	२०	०१	२०	०१
१६	बिगर आदिवासी क्षेत्रात दुग्धव्यवसाय जास्तीत जास्त चालना देण्याच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेली आघाडी पथके.	१७	०२	१९	०२
१७	आदिवासी क्षेत्रात दुग्धव्यवसायात जास्तीत जास्त चालना देण्याच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेली आघाडी पथके योजना.	२२	-	२१	-

१८	आयुक्त कार्यालय, दुग्धव्यवसाय विकास, वरळी.	१०३	-	१००	-
१९	प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी (सर्व).	१५९	-	१५९	-
२०	बृहन्मुंबई दूध योजना, आरे/वरळी/कुर्ला.	६३५	५१२	५९९	४५७
२१	नियंत्रक, गुरे नियंत्रण कार्यालय, गोरेगांव.	२३	०१	२३	-
२२	शासकीय दूध योजना, महाड.	०२	०१	०७	-
२३	शासकीय दूध योजना, रत्नागिरी व शितकरण केंद्र, सडवली, लांजा.	२५	-	२७	-
२४	दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे.	२८	-	२८	-
२५	शासकीय दूध योजना, मिरज व शितकरण केंद्र, जत, शिराळा.	१५१	२८	१५१	२६
२६	शासकीय दूध योजना, पुणे व शितकरण केंद्र, ओतूर, इंदरी (मावळ).	४५	७९	४५	७२
२७	शासकीय दूध योजना, बीड व शितकरण केंद्र, आंबेजोगाई, केज, माजलगांव.	६३	३५	६३	२६
२८	शासकीय दूध योजना, उदगीर व शित. केंद्र, उस्मानाबाद, उमरगा, मुरुड, निलंगा.	९७	५४	९७	३१
२९	शासकीय दूध योजना, महाबळेश्वर व शितकरण केंद्र,	५	-	५	२
३०	शासकीय दूध योजना, सोलापूर व शितकरण केंद्र, बार्शी, अकलूज, सांगोला.	११	०५	११	०५
३१	शासकीय दूध योजना, सातारा व शितकरण केंद्र, वडूज, पारगांव, फलटण.	३५	०४	३५	०६
३२	दुग्धव्यवसाय विकास विभागातील वैयक्तिक पदे	१८०	७७	१६८	-
३३	२९ जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी कार्यालये.	२६३	-	२६३	-
३४	शासकीय दूध योजना, चिपळूण.	१२	०२	१२	-
३५	शासकीय दूध योजना, गोवे-भिवंडी.	-	०२	-	०२
३६	शासकीय दूध योजना, कणकवली व शित.केंद्र. कोलगांव.	१६	-	१५	-
३७	शासकीय दूध योजना, खोपोली.	११	-	१०	-
३८	शासकीय दूध शितकरण केंद्र, सरळगांव.	०३	-	०६	-
३९	मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव, मुंबई.	५८	०६	५८	०६
४०	पशुपैदास व संगोपन केंद्र, पालघर.	१०	-	१०	-
४१	प्रकल्प अधिकारी, दापचरी व शितकरण केंद्र, दापचरी.	७६	२०	७६	०१
४२	दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम, दापचरी.	-	०३	-	०३
४३	शासकीय दूध योजना, चाळीसगांव.	०२	-	०२	-
४४	शासकीय दूध योजना, नाशिक व शासकीय शितकरण केंद्र, चांदवड.	२१	०६	२१	०५
	एकूण-	**२७००**	**९३६**	**२६६१**	**७६०**